## निशाणी क्र. ५८ वरील आदेश

प्रतिवादी क्र. १ व २ यांनी प्रस्तुतचा अर्ज कैफियतमध्ये दुरुस्ती करणेस व कैफियतीची प्रत देणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत कामी प्रतिवादी क्र. १ व २ यांचा नि.क्र. ५३ व ५४ चा कैफियत दुरुस्तीचा अर्ज दि. ०२/०३/२०२० रोजी मंजूर करण्यात आलेला आहे. परंतू, कोरोना माहामारीमुळे प्रतिवादी यांना सदर कैफियत दुरुस्त करणे शक्य झाले नाही. सबब, प्रस्तूत प्रतिवादी क्र. १ व २ चा कैफियत दुरूस्ती अर्ज मंजूर करणेत येवून कैफियतीची प्रत देणेस परवानगी मिळावी अशी प्रतिवादीची विनंती आहे.

३. वादी याने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्याच्या म्हणणेनुसार, सदर कामी दि.०२/०३/२०२० रोजी नि.क्र. ५३ व ५४ वरील अर्ज या न्यायालयाने मंजूर केले आहेत. परंतू सदर अर्ज हा प्रतिवादींनी १९ महिन्यांनतर दाखल केलेला आहे. मे. न्यायालयाने केलेल्या सदरच्या आदेशात सदरची दुरुस्ती ही १४ दिवसाचे आत करणेत यावी असा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. प्रस्तूत प्रतिवादी यांना पुरेशी संधी उपलब्ध असून देखील त्यांनी कोरोना माहामारीचे कारण सदर अर्जात नमूद केले आहे. सदरची दुरुस्ती करण्याकरीता १४ दिवसांचा कालावधी हा लॉकडाऊन काळ सुरु होण्याआधीच समाप्त झालेला होता. सबब, सदरचा अर्ज फेटाळणेत यावा. यदाकदाचित सदरचा अर्ज मंजूर करणेचा झाल्यास प्रस्तूत प्रतिवादी क्र. १ व २ यांना जास्तीत जास्त रक्कम भरणेचा आदेश व्हावा अशी विनंती प्रस्तूत वादी यांनी केली आहे.

४. प्रतिवादी क्र. १ व २ व वादी तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

५. प्रस्तूत अर्ज हा नि.क्र. ५३ व ५४ वरील आदेशाची पुर्तता करणेबाबतचा आहे. मार्च २०२० पासून ते सप्टेंबर २०२० पर्यंत कोव्हीड–१९ चा प्रादुर्भाव पसरल्यामुळे महत्वाचे कामा व्यतिरीक्त सदर न्यायालयाचे कामकाज बंद होते. त्यानंतर, एप्रिल २०२१ ते ५ सप्टेंबर २०२१ पर्यंत लॉकडाऊन जाहिर करण्यात आले होते. मार्च २०२० पासून ते सप्टेंबर २०२१ पर्यंत मुदतीचा फायदयास हा मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये स्थगिती देण्यात आली होती. तरीही, प्रतिवादींनी सदरचा अर्ज हा कोर्ट सुरु झाल्यानंतर १ महिन्याचे विलंबाने दिलेला आहे. प्रस्तुतचा दावा वादीने वाटप, पृथक कब्जा व निरंतर ताकिदीकरीता दाखल केला आहे. त्यामुळे सदर विलंब माफ करणे उचित वाटते. परंतू, निश्चितच प्रतिवादी यांनी झालेल्या विलंबाबत वादीस खर्च देणेबाबत आदेश पारीत करणे उचित वाटते. सबब, प्रस्तुत अर्ज खर्चासह मंजूर होण्यास पात्र आहे असे वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेः

## आदेश

१. अर्ज रक्कम रुपये १०० च्या खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी खर्चाची रक्कम रु.१००/– वादीस दिल्यानंतर १४ दिवसांचे आत कैफियतीमध्ये नियोजित दुरूस्ती करून कैफियत दुरूस्तीची प्रत दयावी.

स्थळ : देवगड ( बी.आर.पाटील )
दिनांकः०६/१२/२०२१ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

BALKRISHNA RAJARAM PATIL

Digitally signed by BALKRISHNA RAJARAM PATIL
Date: 2021.12.07 11:12:03 +0530